# उन्हाळ्यातही चिकन, माशांचे दर चढेच



## मांसाहारी प्रेमींच्या खिशाला कात्री

✔ चिखली/प्रतिनिधी

एकीकडे उष्णता वाढलेली असतानाही दुसरीकडे चिकन व माशांच्या दरात वाढ झाली आहे. झाल्याने, मांसाहारी खवय्यांच्या खिशाला वाढीव झळ बसू लागली आहे.

चिकन विक्रेत्यांकडून चिकन तीनशे रुपये प्रति किलो दराने विकले जात आहे. माशांच्या दरातही प्रति किलो वीस ते तीस रुपयांची वाढ झाली आहे. सध्या वाढलेली उष्णता, पाण्याची टंचाई यामुळे बहुतांश पोल्ट्री फार्म बंद आहेत. परिणामी ब्रॉयलर कोंबड्यांची कमतरता जाणवू लागली आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठ्यात तुटवडा निर्माण झाल्याने चिकनचे दर वाढले आहेत. सध्या उन्हाळ्यात तीनशे रुपये किलो दराने विकले जात आहे. यामुळे बहुतांश खवैय्यांनी चिकनऐवजी मासे खाण्याकडे मोर्चा वळविला आहे.

उजनीतील पाणी झपाट्याने कमी होत असल्याने, मासे मिळण्याचे प्रमाणही कमालीचे घटले आहे. यामुळे स्थानिक मासे विक्रेत्यांनी माशांच्या दरातही वीस ते तीस रुपयांपर्यंत वाढ केली आहे. एरवी ७० ते ८० रुपये प्रतिकिलो दराने मिळणारे चिलापी मासे आता शंभरीपार गेले आहेत. मासे व चिकन महागल्याने ढाबा, हॉटेल व्यावसायिकांची व मांसाहाऱ्यांची चांगलीच कोंडी झाली आहे. सध्या वाढलेली उष्णता, पाण्याची टंचाई, पक्षांची वाढलेली मर यामुळे बहुतांश पोल्ट्री शेड बंद अवस्थेत आहेत. बॉयलर कोंबड्यांची टंचाई जाणवत आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी होत असल्याने चिकनचे दर वाढलेले आहेत असे कोंबड्यांच्या विक्रेत्यांनी सुराज्यशी बोलताना सांगितले.

### गावरान कोंबड्या महागल्या

उन्हाळ्यात चिकन व माशांचे दर उतरलेले असतात. याशिवाय गावरान कोंबड्या व अंड्यांना जास्त मागणी नसते. यंदा मात्र याउलट परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या चिकन व माशांचे दर वाढलेले असताना आता गावरान कोंबड्याही महागल्या आहेत. गावरान कोंबडी चारशे तर कोंबडा पाचशे रुपयांनी विकला जात आहे. यामुळे घर प्रपंच बघत बघत दहा-वीस कोंबड्यांचा खुराडा सांभाळणाऱ्या गृहिणींना उन्हाळ्यातही चांगले पैसे मिळत आहेत.

## संक्षिप्त वृत्त



तीन दिवसापासून वादळी वाऱ्यामुळे भंडारेकवठे येथील घराची पडझड झाली आहे.

### भंडारकवठ्यातील मुक्काणे कुटुंब उघड्यावर

✔ **सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे भागात गेल्या तीन दिवसांपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडत आहे. तीन दिवसांपूर्वी आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे तेलगावच्या सिमेवर असलेल्या रमेश महादेव मुक्काणे यांच्या वस्तीवरील पत्रे उडून गेले. वस्तीची पूर्णपणे पडझड झाली. त्यामुळे मुक्काणे यांचा संसार उघड्यावर पडला आहे. मुक्काणे यांची परिस्थिती गरिबीची असून त्यांना त्यांचे घर वसवण्यासाठी आर्थिक मदत करण्याची मागणी भंडारकवठे येथील ग्रामस्थांनी केली आहे.



पंढरपूर येथील कर्मयोगी इन्स्टिट्यूटमध्ये माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात पार पडला.

### कर्मयोगी महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा


✔ **पंढरपूर** : येथील कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीमध्ये २०१२ ते २०२३ या जवळपास ११ वर्षांत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळावा दि. १३ एप्रिल रोजी पार पडला. अनेक विद्यार्थी राजकारण, उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात काम करीत असून त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे. स. १० वा. माजी विद्यार्थी एकत्र आल्यावर सर्वांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत करण्यात आले. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनियरिंग विभागाने आयाजन केले होते. मेळाव्यामध्ये ५० हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सुरुवात माजी विद्यार्थी प्रतिनिधी प्रीतम वठारे व निशा अंध यांच्या हस्ते दीप प्रज्वलाने करण्यात आली. विभाग प्रमुख प्रा. एस. एम. लंबे यांनी विभागाच्या प्रगतीचा आढावा मांडला. मोठ्या पदावर कार्यरत, परदेशात कार्यरत, उद्योजक असलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक यांनी मेळाव्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य एस. पी. पाटील, प्राचार्य ए. बी. कणसे, रजीस्ट्रार जी. डी. वाळके, उपप्राचार्य जे. एल. मुडेगावकर, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, विभागप्रमुख प्रा. राहुल पंचाळ, प्रा. अनिल बाबर, प्रा. सोमनाथ लंबे, प्रा. दीपक भोसले, प्रा. अभिनंदन देशमाने आदी उपस्थित होते. प्रा. आशिष जोशी यांनी संयोजक म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. भक्ती जाधव व अथर्व रोकडे यांनी केले. ऋतुजा पाटील हिने आभार मानले.

### टँकरच्या धडकेने पालखीतील तरुणाचा मृत्यू

✔ **सोलापूर** : गॅस टँकरच्या धडकेने सावरगाव (जि.नाशिक) येथील पालखीतील तरुण भाविक गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात पुणे महामार्गावरील यावली पाटीजवळ शनिवारी (दि.२०) सकाळच्या सुमारास घडला. संकेत श्रावण निकम (वय २२ रा. सावरगाव ता.येवला जि.नाशिक) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो सावरगाव येथील स्वामी समर्थ मठाच्या पालखीतून इतर भाविकांसोबत अक्कलकोट येथे पायी निघाला होता. मोहोळजवळील यावली पाटीजवळ सकाळी ७ वाजेच्या सुमारास पाठीमागून दुचाकी धडकल्याने तो खाली कोसळला. त्यावेळी सोलापूरच्या दिशेने जाणारा गॅस टँकर धडकल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला विलास काकड (भाविक) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला. मयत संकेत निकम हा अविवाहित असून त्याच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## सहवेदना

### सुशीला देशमुख



✔ **अकलूज** : सुशीला भगवानराव देशमुख यांचे शनिवारी (दि.२०) पहाटे पुणे येथे निधन झाले. अकलूज येथील मोहिते पाटील परिवाराचे स्वीय सहाय्यक भगवानराव देशमुख यांच्या त्या पत्नी होत्या. शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख यांच्या सासुबाई होत्या. त्यांच्या पश्चात कन्या सुनीता देशमुख व नातू असा परिवार आहे.

### अनिल तालिकोटी



✔ **सोलापूर** : सोलापूर येथील शिवशिंपी समाजातील अनिल सिद्रामप्पा तालिकोटी (वय ५५) यांचे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रविवारी (दि.२१) सकाळी ९ वाजता नेहरूनगर येथील राहत्या घरापासून निघणार आहे. अंत्यसंस्कार लिंगायत स्मशानभूमी भवानी पेठ येथे होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक विवाहित मुलगी व नातवंडे असा परिवार आहे.

## आनंदनगर येथे विवाहित व्यक्तीची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : नई जिंदगी परिसरातील आनंदनगर भाग-३ येथे राहणाऱ्या एका ३५ वर्षीय विवाहित व्यक्तीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

ही घटना शनिवारी (दि.२०) पहाटेच्या सुमारास घडली. गुलाब चांदसाहेब सय्यद असे मयत इसमाचे नाव आहे. शनिवारी सकाळी ८ वाजेच्या पूर्वी त्याने राहत्या घरातील छताच्या लोखंडी हुकाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला होता.

गुलाब सय्यदचा सायकल दुरुस्तीचा व्यवसाय होता. त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगी आणि दोन मुले असा परिवार आहे. घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे. महिला हेड कॉन्स्टेबल बिराजदार तपास करीत आहेत.

## बाजार समितीत सेलहॉल, सुविधा, स्टोरेजची गरज

### फैयाज बागवान यांची मागणी

✔ उत्तर सोलापूर/प्रतिनिधी



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आंब्यासह इतर फळांची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रशासनाच्यावतीने विक्री, साठवणूक व प्रक्रियेसाठी अजून उपाययोजना करण्याची गरज आहे, अशी मागणी फळ विक्रेता संघाचे अध्यक्ष फैयाज बागवान यांनी सुराज्य प्रतिनिधीशी बोलताना केली आहे.

सोलापूर, महाराष्ट्र, आंध्र व कर्नाटक व इतर राज्यातून मोठ्या प्रमाणात केसर, हापूस, बदाम, रत्नागिरी, रायग व इतर वाणांचे आंबे मोठ्या प्रमाणात आवक होत आहे. बदलत्या हवामानाचा फटका आंबा उत्पादकांना बसत आहे. दोन ते तीन महिनेच आवक-जावक असते. यासोबतच डाळिंब, पेरू, चिक्कू व इतर फळेही मोठ्या प्रमाणात येतात. खराब होऊ नये म्हणून काही वेळातच मिळेल त्या भावात विक्री करावे लागते. काही वेळेस मोठ्या प्रमाणात नुकसानही सहन करावे लागते. बाजार समितीत अल्प प्रमाणात सुविधा असून ती अपुरी आहे. अवकाळी पाऊस, कडक उन्हाळा, ढगाळ वातावरणामुळे नुकसान होत आहे. प्रशासनाच्या वतीने जास्तीत जास्त सुविधा, उपाय योजना करण्याची गरज आहे. जेणेकरून व्यापारी,शेतकरी व बाजार समितीचे नुकसान होणार नाही. ग्राहकांना योग्य दरामध्ये चांगला माल ते स्वस्त दरात मिळावे असेच प्रयत्न करण्यात यावे अशी आमची फळ व्यापारी वर्गाची मागणी असल्याचेही बागवान यांनी सांगितले.

## अकलूजमध्ये मतदार जनजागृती सायकल रॅली

✔ अकलूज/प्रतिनिधी

अकलूज नगरपरिषद मुख्याधिकारी तथा नोडल अधिकारी दयानंद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज नगरपरिषद हद्दीतून शुक्रवारी स. ७ वाजता अकलूज नगरपरिषद कार्यालय येथून सायकल रॅलीस प्रारंभ करण्यात आला.

सध्या चालू असलेल्या ४३-माढा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार टक्केवारी वाढावी म्हणून स्वीप कार्यक्रमांतर्गत आज ही मतदार जनजागृती सायकल रॅली घेण्यात आली. अकलूज नगरपरिषद कार्यालय येथून सुरुवात करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, कर्मवीर चौक, शिवाजीनगर बायपासमार्गे, माळेवाडी कॉलेज, संत सावतामाळी चौक येथून परत माळेवाडी कॉलेज, प्रतापसिंह चौक, सदुभाऊ चौक, गांधी चौक मार्गे विजय चौक, शिवसृष्टी किल्ला आणि अकलूज नगरपरिषद कार्यालय येथे येऊन सर्वांना मतदार जनजागृती शपथ देऊन समारोप करण्यात आला.

अकलूज नगरपरिषद मुख्याधिकारी तथा नोडल अधिकारी दयानंद गोरे, राजाराम नरुटे, बाळासाहेब वाईकर, सुनिल काशिद व सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहभाग घेतला.



## सांगोल्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बॅनर फाडले

### काही काळ तणाव; दहा जणांवर गुन्हा दाखल

✔ **सांगोला** : सांगोला शहरातील जय भवानी चौकात गुरुवारी (दि.१८) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तीन बॅनर सात ते दहा लोकांनी फाडले. त्यानंतर काही काळ रात्री नऊ वाजता गोंधळ निर्माण झाला. पोलिसांच्या तत्परतेमुळे त्वरित शांतता निर्माण झाली असून दहा लोकांवर गुन्हा दाखल झाला आहे.

सांगोला शहरामध्ये रामनवमीनिमित्त मिरवणूक आयोजित केली होती. १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शहरात चौका-चौकात अभिवादनाचे बॅनर लावले होते. दहा लोकांनी एकत्र येऊन तीन बॅनर फाडले. त्यामुळे गोंधळ सुरू झाला. तेवढ्यात पालीस उपनिरीक्षक जगताप, हवालदार भरम शेट्टी हे तेथे आले. त्यांनी परिस्थित नियंत्रणात आणली.

## साठे प्रशालेच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी तिसऱ्यांदा भांगे

### उपाध्यक्षपदी माधुरी साठे यांची बिनविरोध निवड

✔ माढा/प्रतिनिधी

माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी तिसऱ्यांदा धैर्यशील भांगे यांची तर उपाध्यक्षपदी माधुरी साठे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

प्रशालेच्या शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठण शुक्रवारी करण्यात आले. त्यात किरण पवार, सुनील वाळके, प्रवीण पवार, विनोद साळुंके यांचेसह ५० टक्के महिलांमधून विद्या कवडे, लीना राऊत, उषा खरात, पूनम सुरवसे, लक्ष्मी भालेराव यांचा समावेश आहे. सदस्यांनी





अध्यक्षपदी धैर्यशील भांगे व उपाध्यक्षपदी माधुरी भैय्यासाहेब साठे यांची बिनविरोध निवड केली.

भांगे यांनी आजपर्यंत गेल्या १२ वर्षाहून अधिक काळ शालेय समितीच्या माध्यमातून केलेल्या कामावर तिसऱ्या वेळी विश्वास दाखवत बिनविरोध निवड केली. भांगे यांनी २०१३ पासून अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर शाळेत पिण्याच्या पाण्यासाठी बोअर, फिल्टर, संगणक, स्मार्ट टिव्ही, वृक्षारोपण, शाळांची दुरूस्ती, परगावच्या विद्यार्थ्यांसाठी सायकल बँक, शाळेसाठी वाचनालय, सीसीटीव्ही यासारख्या कामांसाठी पंचवीस लाखाहून अधिक लोकवर्गणी जमा केली. प्राथमिक शाळा शासनाच्या मॉडेल स्कूल योजनेस पात्र ठरली. सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशाला ही पीएमश्री योजनेस पात्र ठरली आहे. त्यांच्या निवडीबद्दल गटशिक्षणाधिकारी विकास यादव, नगराध्यक्षा मिनल साठे, मोहोळचे विस्ताराधिकारी बंडू शिंदे, कुर्मदास साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, माजी जि. प. सदस्य झुंजार भांगे, गुरूराज कानडे, नगरसेवक नितीन साठे, मुख्याध्यापक नागेश खेडकर आदींनी अभिनंदन केले आहे.

## जिल्ह्यात आर.टी.ई प्रवेशासाठी ३९ हजार अर्ज

### पहिलीसाठी अर्ज भरणे प्रक्रियेस सुरुवात

✔ सोलापूर/प्रतिनिधी

जिल्ह्यात आर टी इ प्रवेशासाठीची प्रक्रिया नुकतीच सुरू झाली आहे. एकूण ३९ हजार ४७७ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होताच ३२६ प्रवेश अर्ज प्राप्त झाले असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत दुर्बल घटकांना शाळांत पंचवीस टक्के आरक्षित जागांवरील प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे . आर. टी.इ प्रवेशाच्या प्रतीक्षेत असलेल्या लाखो पालकांना आपल्या पाल्याच्या प्रवेशाचा अर्ज भरण्याची संधी आहे. सोलापूर जिल्ह्यात आर.टी.इ प्रवेशासाठी ३,३९३ शाळांमधून ३९ हजार ४४७ जागा आहेत. १९ एप्रिलपर्यंत ३२६ अर्ज प्राप्त झाले आहेत. आर.टी.इ प्रवेशासाठी शाळा नोंदणीसाठी दिलेल्या मुदतीत अनेक शाळांनी नोंदणी न केल्याने सुमारे एक आठवडा प्रवेश प्रक्रिया लांबली. यंदा राज्यातील एकूण ७५ हजार ९७२ शाळांनी नोंदणी केली आहे.

कायद्यात बदलानुसार विद्यार्थ्यांना प्रथमतः अनुदानित




शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये प्रवेश दिला जाणार आहे. पूर्वी विद्यार्थ्यांना केवळ इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश दिला जात होता. मात्र आता इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा पर्याय शेवटी ठेवला आहे. मिळालेली शाळा चौथीपर्यंत असेल तर पुढील इयत्ता पाचवीचा प्रवेश कोणत्या शाळेत हा प्रश्न पुन्हा उद्भवणार आहे. यावर्षी या परीक्षेसाठी राज्यात तब्बल नऊ लाख ७२ हजार ७८९ जागा उपलब्ध आहेत. पालकांनी प्राधान्यक्रम ठरवून एक किलोमीटर परिसरातील शाळा निवडावी. विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व शाळा व त्यानंतर सहाय्यक शाळा या प्राधान्याने प्रवेश दिला जाईल. एखाद्या पालकाला प्राधान्यक्रम म्हणून अनुदानित शाळाऐवजी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेची किंवा शासकीय शाळेची निवड करायची असल्यास पालकाच्या प्राधान्यक्रमानुसार संबंधित शाळा निवडता येईल.

विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून एक किलोमीटरपर्यंत अंतरावर अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेची शाळा नसेल आणि एक किलोमीटरच्या अंतरावर अर्थसहाय्यता शाळा असेल तर अशा परिस्थितीतच त्या स्वयंअर्थ सहाय्यक शाळेत मुलांना आर.टी.इ संदर्भात प्रवेश दिला जाईल, असेही शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## संग्रामनगर येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव उत्साहात साजरा

✔ **अकलूज** : श्री ब्रह्मचैतन्य श्रीराम मंदिर संग्रामनगर (ता. माळशिरस) येथे भगवान श्रीरामप्रभूंचा जन्मोत्सव विविध सामुदायिक उपासना व उपक्रमाने साजरा झाला. चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) ते श्रीराम नवमीपर्यंत नऊ दिवस रोज पहाटे पाच ते सहा वाजता श्रीं ची काकड आरती तसेच श्रीराम जयराम जय जय राम या सिध्दतारक मंत्राचा अखंड जप, दुपारी विविध भजनी मंडळाची भजन सेवा, रोज सायंकाळी ६:३० ते ८:३० वाजता सामुदायिक श्रीराम रक्षा स्तोत्राची सलग तेरा अवर्तन घेण्यात आली.

गुढी पाडव्यादिवशी काकड आरतीनंतर सकाळी ६:०० ते ७:३० वाजता ईश्वरी यादव यांच्या हस्ते दुग्ध रूद्राभिषेक झाला. श्रीराम नवमीच्या नवरात्रीच्या कलशाची स्थापना करण्यात आली.श्रीराम नवमीच्या दिवशी काकड आरतीनंतर सकाळी ६:०० ते ७:३० वाजता अभय सुभाष जोशी व त्यांच्या पत्नीच्या हस्ते श्रीरामांच्या मुर्तीस,श्री दत्तात्रय व श्रीकृष्णाच्या मुर्तीस दुग्ध रूद्राभिषेक झाला.सकाळी ८ ते १० या वेळेत श्रीराम कृपा भजनी मंडळाचा कार्यक्रम झाला. सकाळी १० ते १२ या वेळेत किर्तनाचा कार्यक्रम झाला.किर्तन विशारद ह.भ.प. गायत्रीदेवी जामदार यांचे श्रीराम जन्मावर नारदीय किर्तन झाले. दुपारी १२:३० वाजता पुष्पवृष्टी होऊन त्यानंतर पाळणा गायन व आरती करण्यात आली. दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत सर्व भाविकांना महाप्रसाद दिल्याचे सद्गुरू श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज विश्वस्त मंडळाने सांगितले.

